महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

===================================================================

जावक क्रमांक – ७५३ /५२ दिनांक :- २२ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा अमरावती मंडळातर्फे जनता दरबार दिन

म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार १०० दिवसांच्या कृती आराखड्याची तात्काळ अंमलबजावणी

मुंबई, दि. २२ एप्रिल, २०२५ :- जनसामान्यांच्या समस्यांकडे तात्काळ लक्ष देत त्यांचे निवारण करण्याच्या उद्देशाने 'म्हाडा'च्या अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे आज जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात आले.

अमरावती मंडळाच्या अमरावती येथील प्रशासकीय कार्यालयात अमरावती मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. विशाल देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एकूण ०७ तक्रार अर्जांवर सुनावणी करण्यात आली. श्री. देशमुख यांनी सर्व अर्जदारांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करत अर्जदारांच्या मागण्या व प्रलंबित कामे तत्परतेने आठ दिवसात सोडविण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले आहेत. या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करत अमरावती मंडळाने आजचा जनता दरबार यशस्वीपणे पार पाडला आणि शासनाच्या जनकल्याणकारी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचा प्रत्यय दिला.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण




-----------------------------------------------------------------------------------

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :
@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial